**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक २४ मे २०२६**

**ठळक बातम्या**

1. **अमरावती मार्गावरील निमजी गोंडखैरी इथं गोदाम लॉजिस्टिक्सचं मुख्यमंत्री फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत उद्‌घाटन.**
2. **राज्यातल्या ५ खासदारांसह १२ जणांना संसद रत्न पुरस्कार जाहीर.**
3. **अनुसूचित जाती उपवर्गीकरणाविरोधात पावसाळी अधिवेशनादरम्यान विधानसभेला घेराव घालण्याचा दलित संघटनांचा इशारा.**
4. **येत्या 26 तारखेपर्यंत अमरावती, वर्धा आणि चंद्रपूर या जिल्ह्यांसाठी तीव्र उष्णतेचा रेड अलर्ट कायम.**

**आता सविस्तर बातम्या .......**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर आणि गडचिरोली हे 'ग्रोथ मॅग्नेट' म्हणून पुढे येत असून, राज्याचा औद्योगिक पोर्टफोलिओ विस्तारत असताना लॉजिस्टिक्स क्षेत्र अधिक सक्षम आणि उन्नत होणे आवश्यक असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. अमरावती मार्गावरील निमजी गोंडखैरी इथ गोदाम लॉजिस्टिक्स प्रायवेट लिमिटेडचं उद्‌घाटन त्यांच्या आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते पार पडलं, त्यावेळी ते बोलत होते.

अमरावती महामार्ग आता सहा पदरी होत असून, अमरावती रोडवरील या लॉजिस्टिक्स पार्कमध्ये सौरऊर्जा प्रकल्प, इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग तसेच फास्ट चार्जिंग स्टेशन उभारावेत, असा सल्ला यावेळी मंत्री नितीन गडकरी यांनी दिला. सिंधी इथं ड्राय पोर्ट उपलब्ध असल्याने कोणताही माल परदेशात पाठविणे शक्य होणार असल्याचाही त्यांनी पुनरुच्चार केला. या कार्यक्रमाला आमदार परिणय फुके, आमदार आशिष देशमुख, आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकार एका वर्षात कोसळणार असल्याचा लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा दावा हे दिवास्वप्न असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. काँग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाच्या सल्लागार परिषदेच्या

बैठकीत गेल्या मंगळवारी त्यांनी हा दावा केल्याचा आरोप भारतीय जनता पार्टीनं केला आहे.

संसद रत्न’

प्राईम पॉईंट फाउंडेशन या खासगी संस्थेद्वारे दिल्या जाणाऱ्या यंदाच्या ‘संसद रत्न’ पुरस्कारांसाठी १२ खासदार आणि ४ संसदीय समित्यांची निवड झाली आहे. महाराष्ट्रातून श्रीकांत शिंदे, हेमंत सावरा, स्मिता वाघ, नरेश म्हस्के आणि मेधा कुलकर्णी या खासदारांची या पुरस्काराच्या विविध श्रेणींमध्ये निवड झाली आहे. तसंच चरणजित सिंह चन्नी यांच्या अध्यक्षतेखालची कृषी समिती, भर्तृहरी महताब यांच्या अध्यक्षतेखालची वित्त समिती, सप्तगिरी शंकर उलका यांच्या अध्यक्षतेखालची ग्राम विकास आणि पंचायती राज समिती आणि अनुराग ठाकूर यांच्या अध्यक्षतेखालची कोळसा आणि खाण समिती, या ४ संसदीय समित्यांची या पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

कापूस

प्रक्रिया न केलेल्या कापसाच्या आयातीवरचं ११ टक्के सीमाशुल्क रद्द करण्याचा सरकार विचार करत आहे. यंदा कापसाचं उत्पादन आवश्यकतेपेक्षा कमी होणार असल्याच्या अंदाज असल्यानं कापड उत्पादकांच्या प्रतिनिधींनी कापसाच्या आयातीवरचं सीमाशुल्क रद्द करण्याची मागणी केली आहे. अर्थमंत्रालय, वस्त्रोद्योग आणि कृषी मंत्रालय या मागणीवर चर्चा करत असून नजिकच्या काळात यावर निर्णय होण्याची शक्यता आहे अशी माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली.

प्रारूप मतदारयादी

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या २०२६ पोटनिवडणुकीसाठी स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ, नागपूरबाबत प्रारूप मतदारयादी आणि मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. ही यादी जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, तहसील कार्यालये इत्यादी सर्व पदनिर्देशित स्थानांवर उपलब्ध आहे. ज्यांना मतदार यादी किंवा मतदान केंद्रांच्या यादीमध्ये दावे किंवा हरकती घ्यायच्या असतील, त्यांनी यादी प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत म्हणजे २८ मे पर्यंत कार्यालयीन वेळेत लेखी स्वरूपात ती सादर करावीत असं आवाहन करण्यात आलं आहे.

इबोला

आफ्रिकेतल्या काही देशांमध्ये 'इबोला' या आजाराचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता, भारतीय नागरिकांनी पुढची सूचना मिळेपर्यंत काँगो, युगांडा आणि दक्षिण सुदान या भागात प्रवास टाळावा अशी सूचना केंद्र सरकारनं जारी केली आहे. तसंच या देशांमध्ये वास्तव्याला असलेल्या किंवा प्रवास करणाऱ्यांनी स्थानिक प्रशासनानं जारी केलेल्या सूचनांचं पालन करावं असं यात म्हटलं आहे. भारतात अद्याप इबोला आजाराचा एकही रुग्ण आढळला नसल्याचं आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं म्हटलं आहे. दरम्यान आफ्रिकेत वेगाने पसरणाऱ्या इबोलाच्या सार्वजनिक आरोग्य आणीबाणीचा सामना करण्यासाठी मानवतावादी मदतीचा भाग म्हणून भारत सरकारने आज वैद्यकीय साहित्य आणि संरक्षक उपकरणांचा पहिला साठा पाठवला. ही मदत आफ्रिका सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेंशन येथे पाठवण्यात आली आहे.

पश्चिम आशिया

होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यासह इतर मुद्द्यांवर इराणबरोबरच्या वाटाघाटी, इस्राएल आणि इतर मित्रदेशांबरोबर चर्चा करुन अंतिम टप्प्यात आणल्या असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी म्हटलं आहे. लवकरच याबाबतची घोषणा केली जाईल, असं त्यांनी ट्रुथ सोशल या समाजमाध्यमावर म्हटलं आहे. इराणच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बकाई यांनी सांगितलं की अमेरिकेबरोबरची चर्चा प्रगतीपथावर आहे. मात्र सर्वच कळीच्या मुद्द्यांवर सहमती झाली नाही असं त्यांनी स्पष्ट केलं. अमेरिका परस्परविरोधी वक्तव्य करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

उपवर्गीकरण

अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाविरोधात बार्टीकडे ८० हजार लोकांनी आपली मतं नोंदवली असून बहुसंख्य लोकांनी याला विरोध दर्शवला आहे असं अनुसूचित जाती उपवर्गीकरण पुनर्विलोकन समितीचे राहुल डांबळे यांनी सांगितलं. वर्गीकरणाला विरोध करण्यासाठी पावसाळी अधिवेशनादरम्यान विधानसभेला घेराव घातला जाईल असा इशारा त्यांनी माध्यमांशी बोलताना दिला. ३० जूनला हे आंदोलन केलं जाईल असं त्यांनी सांगितलं. आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी राज्यभर बैठका सुरू असल्याचं डांबळे यांनी सांगितलं.

आंदोलन

खरीप हंगाम सुरू होण्यापूर्वीच तिवसा तालुक्यातील विमाधारक सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ३५ हजार रुपयांची आर्थिक मदत विमा कंपनीमार्फत तातडीने देण्यात यावी, तसच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना 'भारतरत्न' प्रदान करावा, या दोन मागण्यांसाठी शेतकरी आणि गुरुदेव भक्तांसह पाच जूनपासून तिवसा तहसील परिसरात बेमुदत अन्नत्याग आंदोलनाचा इशारा सामाजिक कार्यकर्ते मुकुंद पुनसे यांनी दिला आहे . मागील खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे तालुक्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शेतकरी नेत्यांच्या माहितीनुसार, जिल्ह्यातील १ लाख ८५ हजार ५६० शेतकऱ्यांनी सुमारे ८.९० कोटी रुपये प्रीमियम भरून पीक विमा घेतला होता. याशिवाय राज्य आणि केंद्र शासनाकडून प्रत्येकी २.१२ कोटी रुपयांचा हिस्सा जमा करण्यात आला. मात्र, नुकसान झाल्यानंतर जिल्ह्यातील केवळ नऊ हजार ३४२ शेतकऱ्यांना सुमारे १.५० कोटी रुपयांचा परतावा मंजूर करण्यात आल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत.

हंसराज अहीर

भाजप कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय चिंतनाबरोबरच पक्षाच्या संघटनात्मक शक्तीचा प्राधान्याने विचार करायचा आहे. पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी पक्ष हितासाठी समर्पित भावनेतून काम केलं पाहिजे असं आवाहन पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी केलं. चंद्रपूर जिल्ह्यातील वलनी-बोर्डा इथं पंडित दीनदयाल उपाध्याय जिल्हा प्रशिक्षण अभियाना अंतर्गत आयोजित पदाधिकारी कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरास ते संबोधित करत होते. निलावार फार्म इथं आज हे शिबीर आयोजित करण्यात आलं होतं.

हवामान

हवामान! येत्या 26 तारखेपर्यंत अमरावती, वर्धा आणि चंद्रपूर या जिल्ह्यांसाठी तीव्र उष्णतेचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. सोबतच अकोला, नागपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यात देखील 26 तारखेपर्यंत उष्णतेची लाट कायम राहणार असून ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. बुलढाणा वाशिम हे जिल्हे वगळता इतर

सर्वच जिल्ह्यांमध्ये उष्णतामान कायम राहण्याचा अंदाज प्रादेशिक हवामान खात्यांनं वर्तवला आहे. एप्रिल महिन्यापासून अमरावती जिल्ह्यात तीव्र उष्णतेच्या लाटा वाहत असून जिल्ह्यात उष्माघात सदृश्य १५ रुग्ण दाखल झाले होते. त्यांच्यावर आवश्यक उपचार करून त्यांना सुटी देण्यात आली, अशी माहिती जिल्हा सामान्य रुग्णालय प्रशासनाने दिली आहे. दरम्यान, मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली जिल्ह्यात ठिकठिकाणी मॉन्सूनपूर्व पावसाचा तडाखा बसला असून काही भागांत गाराही पडल्या. अनेक भागांत आंबा, पपई, केळीच्या फळबागांना या पावसाचा फटका बसला आहे.

## शंभर मीटर स्पर्धा

बिहारमधे रांची इथं आयोजित 'फेडरेशन चषक ॲथलेटिक्स' स्पर्धेत गुरिंदरवीर सिंह यानं पुरुषांच्या शंभर मीटर धावण्याच्या स्पर्धेत राष्ट्रीय विक्रम नोंदवत सुवर्ण पदक जिंकलं. याबरोबरच तो आगामी ग्लासगो इथं आयोजित - राष्ट्रकुल स्पर्धेसाठीही पात्र ठरला. गुरिंदरवीर यानं १० सेकंद नऊ मिली सेकंद अशी विक्रमी वेळ नोंदवली.

## फ्रेंच खुली टेनिसस्पर्धा

फ्रेंच खुली टेनिसस्पर्धा आजपासून पॅरिसमधे सुरु होत आहे. त्रिवार विजेता नोवाक जोकोविच यंदा आपलं १पंचवीसावं ग्रँडस्लॅम विजेतेपद मिळवण्याच्या तयारीने उतरणार आहे. आज त्याचा सामना फ्रान्सचा जिओवानी एम्पेत्शी पेरिकार्ड याच्याबरोबर होईल. भारताचा युकी भांबरी न्यूझीलंडच्या मायकेल विनसच्या सोबतीने दुहेरीत उतरणार आहे. एन श्रीराम बालाजीचा साथीदार ब्राझिलचा मार्सेलो डेमोलिनर असेल. स्पर्धेचं हे १२५ वं वर्ष आहे.

## आयपीएल

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत, आज सायंकाळी साडेसात वाजता कोलकाता नाईट रायडर्स आणि दिल्ली कॅपिटल्स या संघांदरम्यान कोलकाता इथं सामना होणार आहे.

*****